निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

माहे मार्च २०१८ ते मे २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रमामध्ये अंशत: बदल केल्याबाबतचे आदेश..

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: ०९ फेब्रुवारी २०१८

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून).*

**विषय :- माहे मार्च २०१८ ते मे २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रमामध्ये अंशत: बदल केल्याबाबतचे सुधारीत आदेश.**

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि.२२ जानेवारी २०१८ व दि.२ फेब्रुवारी २०१८ रोजी उक्त निवडणूक कार्यक्रमासंबंधात निर्गमित केलेली निर्देशपत्रे.

महोदय/महोदया,

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाकडून उक्त संदर्भीय पत्रांद्वारे माहे मार्च २०१८ ते मे २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी संगणकीकृत पध्दतीने दि.०५ फेब्रुवारी २०१८ ते १० फेब्रुवारी २०१८ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे भरून स्वीकृतीची प्रक्रिया नियोजित आहे, आणि

ज्याअर्थी, तांत्रिक अडचणींमुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी संगणकीकृत पध्दतीने नामनिर्देशनपत्रे भरण्यात अडचणी येत आहेत, अशा तक्रारी संबंधित जिल्ह्यांकडून प्राप्त झाल्या आहेत, आणि

ज्याअर्थी, विहित मुदतीपूर्वी संबंधित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया पार पाडणे बंधनकारक आहे,

त्याअर्थी, भारतीय संविधानातील तरतुदी तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०-अ (४) नुसार आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून उक्त निवडणूक कार्यक्रमामध्ये खालीलप्रमाणे अंशत: फेरबदल करण्यात येत आहे:-

१. ज्या ग्रामपंचायतींची मुदत दि.०१ मार्च २०१८ ते दि.०६ मार्च २०१८ या कालावधीत संपत आहे, अशा ग्रामपंचायतींसाठी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मुदत समाप्तीच्या विहित दिनांकापूर्वी

सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असल्याचे लक्षात घेता, या ग्रामपंचायतींसाठी दि.२२ जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या वेळापत्रकानुसारच निवडणूक प्रक्रिया राबविण्यात यावी. **यानुसार अशा ग्रामपंचायतींसाठी शनिवार दि.१० फेब्रुवारी २०१८ या नामनिर्देशनपत्रे स्वीकृतीच्या अखेरच्या दिवशी संगणकीकृत अथवा पारंपारिक पध्दतीने भरलेली नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात यावीत.** तसेच वरील दिवशी सकाळी १०.३० **ते सायंकाळी ६.३० या वेळेत** ही नामनिर्देशनत्रे स्वीकृत करण्यात यावीत, असे निर्देश संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना देण्यात यावेत. या ग्रामपंचायतींसाठी दि.१० फेब्रुवारी २०१८ या विहित दिनांकानंतर नामनिर्देशनपत्रे स्वीकृत न करण्याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना लेखी निर्देश द्यावेत.

२. मात्र ज्या ग्रामपंचायतींची मुदत दि.०७ मार्च २०१८ ते ३१ मे २०१८ या कालावधीत संपत आहे, अशा तसेच नव्याने स्थापित झालेल्या व या निवडणूक कार्यक्रमांतर्गत निवडणूक नोटीस प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींसाठी तसेच रिक्त पदांच्या सर्व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्ट-४ मध्ये अंशत: सुधारीत केलेल्या वेळापत्रकानुसार पार पाडण्यात यावा. यानुसार दि.२७ फेब्रुवारी २०१८ रोजी मतदान व दि.२८ फेब्रुवारी २०१८ रोजी मतमोजणी तसेच सार्वत्रिक निवडणुका असलेल्या संबंधित ग्रामपंचायतींचा मुदत समाप्तीचा दिनांक लक्षात घेवून दि.०१ मार्च २०१८ ते दि.०३ मार्च २०१८ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निकाल प्रसिध्दी करण्यात यावी. **वरील ठिकाणी नामनिर्देशनासह निवडणुकीची सर्व प्रक्रिया संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावी. यासाठी दि.१० फेब्रुवारी २०१८ व दि.१२ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत सकाळी १०.३० ते दुपारी ६.३० वाजेपर्यंत संबंधित ठिकाणी नामनिर्देशपत्रे स्वीकारण्यात यावीत.**

३. याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह स्थानिक पातळीवरील निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ लेखी सूचित करण्यात यावे. तसेच स्थानिक पातळीवर प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(स्वाक्षरी)

सोबत: परिशिष्टे - १ ते ४

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.

यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

८. पोलीस महानिरीक्षक (सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व संबंधित)

११. सहायक आयुक्त, संगणकीकरण शाखा, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.

१३. राज्य निवडणूक आयोगाची सर्व कार्यासने

१४. निवड नस्ती (२ प्रती).

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८, दि.०९/०२/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

## परिशिष्ट-१

## राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला फक्त दि.०१ मार्च २०१८ ते दि.०६ मार्च २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२५/०१/२०१८ (गुरूवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०५/०२/२०१८ (सोमवार) ते दि.१०/०२/२०१८ (शनिवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.३० |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१२/०२/२०१८ (सोमवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१५/०२/२०१८ (गुरूवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१५/०२/२०१८ (गुरूवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२५/०२/२०१८ (रविवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत *(गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)* |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२६/०२/२०१८ सोमवार) |
| ८ | निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक (ज्या ग्रामपंचायतींची मुदत दि.०१ व ०२ मार्च २०१८ रोजी संपत आहे, अशा ग्रामपंचायतींच्या निवडणूक निकालाची अंतिम प्रसिध्दी सोमवार दि.२६/०२/२०१८ रोजीच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.) | दि.२७/०२/२०१८ (मंगळवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८, दि.०९/०२/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

*परिशिष्ट-२*

मतदान दि.२७/०२/२०१८

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार दि.०७ मार्च २०१८ ते दि.३१ मे २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रा.पं. संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | १९ |
| २ | | पालघर | ०९ |
| ३ | | रायगड | ०६ |
| ४ | | रत्नागिरी | ०४ |
| ५ | | सिंधुदुर्ग | ०१ |
| कोकण विभाग एकूण | | | ३९ |
| ६ | नाशिक | नाशिक | ०१ |
| ७ | | जळगाव | ५८ |
| ८ | | अहमदनगर | १६ |
| नाशिक विभाग एकूण | | | ७५ |
| ९ | पुणे | पुणे | ३७ |
| १० | | सोलापूर | १३ |
| ११ | | सातारा | ७७ |
| १२ | | सांगली | ०४ |
| पुणे विभाग एकूण | | | १३१ |
| १३ | औरंगाबाद | औरंगाबाद | ०८ |
| १४ | | बीड | २० |
| १५ | | नांदेड | ०३ |
| १६ | | जालना | ०३ |
| १७ | | लातूर | ०१ |
| औरंगाबाद विभाग एकूण | | | ३५ |
| १८ | अमरावती | अमरावती | ०१ |
| १९ | | अकोला | ०१ |
| २० | | यवतमाळ | ०५ |
| २१ | | बुलडाणा | ०३ |
| अमरावती विभाग एकूण | | | १० |
| २२ | नागपूर | वर्धा | ०२ |
| २३ | | चंद्रपूर | ०३ |
| २४ | | गोंदिया | ०१ |
| २५ | | गडचिरोली | १६ |
| नागपूर विभाग एकूण | | | २२ |
| एकूण | | | ३१२ |

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८, दि.०९/०२/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

*परिशिष्ट-३*- मतदान दि.२७/०२/२०१८

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | रिक्त पदे असलेल्या ग्रा.पं. संख्या | पोट निवडणुका असलेल्या एकूण रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ७८ | १५८ |
| २ | | पालघर | ६५ | १३० |
| ३ | | रायगड | १६० | २३८ |
| ४ | | रत्नागिरी | २६३ | ४४४ |
| ५ | | सिंधुदुर्ग | ८० | ११२ |
| | कोकण विभाग एकूण | | **६४६** | **१०८२** |
| ६ | नाशिक | नाशिक | २७८ | ४९३ |
| ७ | | धुळे | ८४ | १३२ |
| ८ | | जळगाव | १३२ | २०६ |
| ९ | | नंदुरबार | ४१ | ४९ |
| १० | | अहमदनगर | १२८ | १९२ |
| | नाशिक विभाग एकूण | | **६६३** | **१०७२** |
| ११ | पुणे | पुणे | २७४ | ५७६ |
| १२ | | सोलापूर | ११७ | १८३ |
| १३ | | सातारा | ४२७ | ८०३ |
| १४ | | सांगली | ४२ | ८८ |
| १५ | | कोल्हापूर | १०९ | १८४ |
| | पुणे विभाग एकूण | | **९६९** | **१८३४** |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद | ७३ | ८६ |
| १७ | | बीड | ४६ | ६५ |
| १८ | | नांदेड | १८९ | ३०० |
| १९ | | परभणी | ७३ | ९९ |
| २० | | उस्मानाबाद | ६५ | ९३ |
| २१ | | जालना | ५८ | ७६ |
| २२ | | लातूर | ११० | १३७ |
| २३ | | हिंगोली | ७९ | १०३ |
| | औरंगाबाद विभाग एकूण | | **६९३** | **९५९** |
| २४ | अमरावती | अमरावती | १३० | २१६ |
| २५ | | अकोला | ९४ | १७६ |
| २६ | | यवतमाळ | २०६ | २९३ |
| २७ | | वाशीम | ५६ | ६५ |
| २८ | | बुलडाणा | १०६ | १५७ |
| | अमरावती विभाग एकूण | | **५९२** | **९०७** |
| २९ | नागपूर | नागपूर | ६४ | ८९ |
| ३० | | वर्धा | ५६ | ८४ |
| ३१ | | चंद्रपूर | ११४ | १५२ |
| ३२ | | भंडारा | ३२ | ५७ |
| ३३ | | गोंदिया | ६५ | ११६ |
| ३४ | | गडचिरोली | २०७ | ५१९ |
| | नागपूर विभाग एकूण | | **५३८** | **१०१७** |
| | एकूण | | **४१०१** | **६८७१** |

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८, दि.०९/०२/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-४

## राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला दि.०७ मार्च २०१८ ते दि.३१ मे २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२५/०१/२०१८ (गुरूवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०५/०२/२०१८ (सोमवार) ते दि.१२/०२/२०१८ (सोमवार) वेळ स. १०.३० ते सायं. ६.३० *(रविवार दि.११/०२/२०१८ हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून)* |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१४/०२/२०१८ (बुधवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१६/०२/२०१८ (शुक्रवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१६/०२/२०१८ (शुक्रवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२७/०२/२०१८ (मंगळवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत *(गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)* |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२८/०२/२०१८ (बुधवार) |
| ८ | निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक (ज्या ग्रामपंचायतींची मुदत दि.०७/०३/२०१८ रोजी संपत आहे, अशा ग्रामपंचायतींच्या निवडणूक निकालाची अंतिम प्रसिध्दी सोमवार दि.२८/०२/२०१८ रोजीच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.) | दि.२८/०२/२०१८ (बुधवार) ते दि.०३/०३/२०१८ (शनिवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र